# मदन उदितनारायण सिंह

**नगरसेवक**

मिरा भाईंदर महानगरपालिका

विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय,

छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

ऑफिस : शॉप नं. १०, राजपूत पॅलेस, आर. एन. पी. पार्क, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५.

दूरध्वनी : 28151461 मोबाईल : 9322598737


मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
म.पा./न.स./ल.प.लक्षवेधी

जावक क्र. ३/१-२०२०-२१

दिनांक:- ११/ १ /२०२१

दिनांक :

दि.१५/०१/२०२१ रोजीच्या मा.महासभेकरिता

**// लक्षवेधी //**

दि.१०/०१/२०२१

**प्रति,**

**मा.नगरसचिव**

मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- मिरा भाईंदर हद्दीतील सर्व खाजगी शाळामार्फत आकारण्यात येणारे अतिरिक्त शालेय शुल्क कमी करणेबाबत.**

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत खाजगी शाळांमार्फत पालकाकंडे शाळा सुरु नसतानाही अतिरिक्त शालेय शुल्क भरणा करण्याची वारंवार मागणी केली जात आहे. कोरोना पार्श्वभुमीवर सर्व शाळांना ऑनलाईन शिक्षण सुरु करणेची परवानगी देण्यात आली त्यानुसार शाळांनी ऑनलाईन शाळा सुरु केल्या. परंतु शासनाने **नर्सरी ते दुसरी पर्यंत ऑनलाईन शाळेस मान्यता दिली नसतानाही काही शाळामार्फत सदरचे ऑनलाईन क्लासेस बळजबरीने सुरु करुन त्याबाबत शालेय फी चा भरणा करणेकरिता सांगणेत आले. तसेच इयत्ता तीसरी ते दहावी पर्यंत ऑनलाईन शाळा सुरु केल्या गेल्या परंतु शाळेमार्फत संगणक फी, लॅब फी,टर्म फी तसेच इतर अनावश्यक शुल्क यांचा भरणा लवकरात लवकर करणेबाबत पालकांना कळविण्यात आले.**

वास्तविक दि. **०८/०५/२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार शासनाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी जर काही शैक्षणिक सुविधांचा वापर करावा लागला नाही व त्याबाबतचा खर्च कमी होणार असल्यास पालकांच्या कार्यकारी समितीमध्ये तसा ठराव करुन त्याप्रमाणे योग्य प्रमाणात फीस कमी करावी** असा स्पष्ट उल्लेख असतानाही **खाजगी शाळांमार्फत सरसकट संपुर्ण वर्षाची अतिरिक्त शालेय शुल्क फी आकारले जात आहे. याबाबत काही पालकांची शाळेवर मोर्चा नेला असता फक्त ठराविक पालकांची फी कमी करुन इतरांची मात्र संपुर्ण शालेय फी आकारली जात असल्याचे माझ्या निर्दशनास आलेले आहे.**

कोरोना लॉकडाऊन काळात सर्व शाळा बंद असतानाही शाळेतील सुविधांचा वापर कमी होतो त्यानुसार शाळेने शालेय फी कमी करणे आवश्यक आहे. लॉकडाऊन काळात अनेक पालक वर्ग तसेच नागरिक यांची नोकरी/व्यवसाय वरुन कमी करण्यात आले असते असतानाही त्यांच्या आर्थिक चणचण असतानाही शालेय प्रशासनामार्फत मानवतेच्या दृष्टीने विचार न करता संपुर्ण शालेय फी भरण्याची सक्ती केली जाते व तसे न केल्यास पाल्यास शाळेतुन कमी करण्यात येईल असे सांगण्यात येते.या सर्व प्रकाराबाबत पालकांच्या माझ्याकडे वारंवार विनंती येत आहेत.

तरी महोदय **मा.महासभेने मिरा भाईंदर हद्दीतील सर्व खाजगी शाळाबाबत अतिरिक्त शालेय फी शुल्क न आकारता फक्त अर्ध्या वर्षाचे शालेय शुल्क आकारणेबाबत** ठराव पारित करुन त्याची काटेकोरपणे अमंलबजावणी करणेकरिता धोरण निश्चित करण्यात यावे अशी मी लक्षवेधी मा.महासभेसमोर मांडत आहे.

आपला विश्वासू,

(मदन उदितनारायण सिंह)
नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत,
श्री. /श्रीमती शिक्षणाधिकारी

मिरा भाईंदर महानगरपालिका

सदरची लक्षवेधी दि. १५/१/२०२१ रोजीच्या मा. महासभेकरिता [illegible] प्रत माहितीस्तव अग्रेषित करण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
(नगरसचिव)